विज्ञान निर्भयता नीती

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

## प्रदूषणमुक्त दिवाळीसाठी फटाके विरोधी अभियान

### विनम्र आवाहन

# विचार करा... फटाके फोडल्याने नक्की काय होते?

विद्यार्थी, पालक व नागरिक, सप्रेम नमस्कार...

आणखी काही दिवसातच दीपावली येईल. ही दीपावली सर्वांना सुखासमाधानाची, आनंदाची ठरावी ही सदिच्छा.

दीपावलीतील फटाके व शोभेच्या दारूची खरेदी आणि नंतर वापर हा आनंदाचा भाग मानला जातो. परंतु आता सुजाण माणसे याबाबत विचार करू लागली आहेत. असे लक्षात येते की, या क्षणिक आनंदासाठी अनेक अन्याय घडतात. ते पुढीलप्रमाणेः

१. प्रचंड ध्वनी प्रदुषण. २. प्रचंड वायू प्रदुषण. ३. अपघाताने भाजणे. ४. आग लागणे. ५. वृध्द, आजारी, परीक्षार्थी या सर्वांना त्रास. ६. फटाके बाल कामगार तयार करतात. फटाके खरेदीतून या चुकीच्या प्रथेला मान्यता व स्थिरता येते. ७. फटाके व शोभेची दारू उडवणे हे १०० टक्के अनुत्पादक आहे. पैशाचा धूर काढणे असेच त्याचे वर्णन करावे लागेल.

वरील सर्व लक्षात घेता कळकळीची विनंती या वर्षी मागील वर्षीपेक्षा फटाके, शोभेची दारू याची खरेदी कमीत कमी/ अजिबात न करण्याचा निश्चय करू या! त्या वाचलेल्या पैशातून छान छान पुस्तके, खेळणी, किल्ल्यासाठीची साधनसामुग्री घेण्याचा संकल्प करू या! आणि गरजूंना मदत करू या. सोबत संकल्प पत्र दिले आहे. ते भरून पालक व विद्यार्थी यांच्या सहीने शाळेत परत द्यावे असे आवाहन आम्ही करत आहोत.

आपले विश्वासू

जयंत नारळीकर | नरेंद्र जाधव | एन डी पाटील | सचिन तेंडुलकर | डॉ. प्रकाश आमटे | डॉ. जब्बार पटेल | नाना पाटेकर

---

विज्ञान निर्भयता नीती

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

## प्रदूषणमुक्त दिवाळीसाठी फटाके विरोधी अभियान

### संकल्प पत्र

मी (संपूर्ण नाव) .................................................. गावः ..................

शाळा .................................................. वर्ग .................. तुकडी ..................

असा संकल्प करीत आहे की, या वर्षीच्या फटाके व शोभेच्या दारुच्या खरेदीत मी रुपये .................. बचत करीन.

या बचत रकमेतून पुस्तके/खेळणी/किल्ला बांधणी साहित्य/अन्य खरेदी करीन. पर्यावरण रक्षण करण्यासाठी हा संकल्प मी मनापासून करीत आहे.

दिनांक : ...........ऑक्टोबर, २०१५

सही : विद्यार्थी पालक नागरिक